झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-३/ ११४८/२०२२
दिनांक :-१३/१०/२०२२.

झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश
(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना)

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता "उपरोक्त अधिनियम" असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/ प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेचे नियोजन आहे.

आणि ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली मिळकत सिध्दार्थनगर, येरवडा या नावाने ओळखल्या जाणा-या (प्रस्तुत जाहिर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करण्यात येत आहे) हे क्षेत्र या प्राधिकरणाकडील पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी, सदर मिळकतीचे मूळ धारक सरकारी मिलिटरी प्रॉपर्टी असे आहे. परंतु मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील PRL/१३६/। दि.१८/०६/१९७९ प्रमाणे ए- गुंठे (१-२९५), ७०२८.६० चौ.मी. क्षेत्राचा ताबा मिलिटरी विभागाकडून मिळालेवरुन दि.१६/११/१९८९ रोजी सरकारी नवीन धारक म्हणून सरकारी अशी नोंद करण्यात आलेली आहे. तसेच दि.०७/०९/२०१५ रोजीच्या सरकारी मिळकत अधिकारी यांचे पत्रावरुन स.नं.२०४पै. व २०५अ पै., येरवडा गावातील अतिक्रमणासह जमीन तहसिलदार, पुणे शहर यांना दि.२५/०६/१९७९ रोजी ताब्यात दिले असल्याचे नमूद केले आहे. उपरोक्त दोन्ही संदर्भावरुन सदर मिळकत ही सरकारी मालकीची असल्याचे दिसून येते.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसुचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे विकसक मे.ग्लोरीफोर्ज बिल्डर्स एल.एल.पी. यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, ७७९०.०० चौ.मी. एवढे क्षेत्र महाराष्ट्र शासन राजपत्र दि.३१/१०/१९८४ भाग-१ मध्ये घोषीत आहे. खालील अनुसुचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने मोजणी नकाशाच्या आधारे त्रिमितीय पध्दतीने येणारे एकूण क्षेत्रफळ ५५११.७१ चौ.मी. इतकी आहे. सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.०७/०७/२०२२ रोजीची पूर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र जुलै १४-२०, २०२२ पृष्ठ क्र. ५२ व ५३ वर तसेच लोकमत व दैनिक जनमंथन या दैनिक वृत्तपत्रात दि.१३/०७/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे

दिसून येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.२१/०७/२०२२ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; तसेच सदर नोटीशीची प्रत मा. आयुक्त, महानगरपालिका व जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना देखील देणेत आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, संबंधित योजनेतील सुमारे १४२ रहिवासी यांनी दि.२८/०७/२०२२, दि.०२/०८/२०२२, दि.१२/०८/२०२२ आणि दि.१८/०८/२०२२ रोजी आक्षेप/हरकत अर्ज दाखल केले होते. दाखल आक्षेप/हरकत अर्जाच्या अनुषंगाने संबंधितांना दि.२९/०८/२०२२ रोजी सुनावणीची संधी देण्यात येवून सदर हरकतीवर दि.१२/०९/२०२२ रोजी सर्व मुद्द्यांवरील खुलाश्यासह स्वतंत्र निकालपत्र पारित करण्यात आलेले आहे. त्यामुळे या प्रकरणी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास), अधिनियम १९७१ कलम ३क नुसार पुढील कार्यवाही करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

<u>अनुसूची</u>

महानगरपालिकेचे नाव :- पुणे महानगरपालिका
झोपडपट्टीचे नाव :- स.नं.२०४ पैकी, सि.स.नं.२१४६ पैकी, सिध्दार्थनगर, येरवडा, विमाननगर, पुणे

| गाव | फा.प्लॉ.क्र / सि. स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) पूर्णत: | चतु:सिमा (मोजणी नकाशानुसार) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सिध्दार्थ नगर, नगररोड, येरवडा | स.नं.२०४ पैकी, सि.स.नं.२१४६ पैकी | सरकारी | ५५११.७१ चौ.मी. | पुर्वेस - लागू रस्ता<br>पश्चिमेस - लष्कर हद्द<br>दक्षिणेस - न.भू.क्र. २१४५ पैकी, स.नं.२०५अ पैकी व लागू रस्ता<br>उत्तरेस - लष्कर हद्द | |

सदरची नोटीस ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आली.

13.9.22

(राजेंद्र निंबाळकर) भा.प्र.से
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- १३ /०९ /२०२२

प्रत-

१. मा.जिल्हाधिकारी, पुणे - यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव सादर.
२. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका - यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव सादर.